रविवार, दिनांक 26 जानेवारी 2025 निमित्त महाईन्यूजच्या कार्यालयास सुट्टी असल्याने सोमवार दिनांक 27 जानेवारी 2025 रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची आमचे वाचक, जाहिरातदार, हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.

प्रजासत्ताक दिनाच्या खूप खूप शुभेच्छा
-संपादक



| वर्ष - 8 | अंक -197 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

वंदे मातरम्
प्रजासत्ताकदिनानिमित्त देशबांधवांना शुभेच्छा!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 26 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## तिघांना पद्मभुषण, 11 जणांना पद्मश्री

# महाराष्ट्रातील 14 मान्यवरांना पद्म पुरस्कार!

### देशभरातील 49 जणांची पुरस्कारासाठी निवड, मनोहर जोशींना पद्मभूषण, अशोक सराफ यांना पद्मश्री

। मुंबई । महाईन्यूज

**मुंबईः दरवर्षी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्र सरकारकडून पद्म पुरस्कारांची घोषणा केली जाते. यंदाही प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला पद्म पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. भारतरत्न पुरस्कारानंतर पद्म पुरस्कार हा प्रतिष्ठेचा मानला जातो. देशाच्या सर्वोच्च नागरिक सन्मानांपैकी एक असलेला पद्म पुरस्कार हा तीन श्रेणींमध्ये दिला जातो. पद्म विभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री पुरस्कारानं गौरविण्यात येणाऱ्या मान्यवरांच्या नावांची केंद्र सरकारच्या वतीनं घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये राजकारण, कला, क्रीडा, सामाजिक कार्य इत्यादी क्षेत्रात काम करणाऱ्या देशातील एकूण 139 मान्यवरांचा पद्म पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे.**





केंद्र सरकारने जाहीर केलेल्या या पद्म पुरस्कारांमध्ये 7 मान्यवरांचा पद्म विभूषण पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. तर माजी मुख्यमंत्री मनोज जोशी, पंकज उधास, सुशील मोदी यांसह 19 जणांना पद्मभूषण प्रदान करण्यात येणार आहे.

#### पद्मभूषण पुरस्काराने 'या' व्यक्तींचा सन्मान

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांना त्यांच्या राजकीय आणि सार्वजनिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी मरणोत्तर पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. तसेच भारतातील उत्कृष्ट गझल गायक पंकज उधास यांनाही मरणोत्तर पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. तसेच बॉलिवूडचे अतिशय प्रसिद्ध निर्मिते-दिग्दर्शक शेखर कपूर यांना त्यांच्या सिनेसृष्टीतील कारकिर्दीसाठी पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे.

#### महाराष्ट्रातील किती दिग्गजांना पद्मश्री पुरस्कार?

कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्यासाठी महाराष्ट्रातील 6 मान्यवरांना पद्मश्री जाहीर झाले आहेत. यात सुलेखनकार अच्युत पालव, मराठी चित्रपसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, शास्त्रीय गायक अश्विनी भिडे देशपांडे, पार्श्व गायिका जस्पिंदर नरुला, ज्येष्ठ बासरी वादक रानेद्र भानू मजुमदार, ज्येष्ठ चित्रकार वासुदेव कामत यांना जाहीर झाले आहेत. व्यापार आणि उद्योग क्षेत्रात वेगळा ठसा उमटविणाऱ्या अरूंधती भट्टाचार्य यांना तर पर्यावरण आणि वनसंवर्धन करणारे चैत्राम पवार सामाजिक क्षेत्रातील कार्यासाठी पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील कार्यासाठी महाराष्ट्राचे अरण्य ऋषी वन्यजीव अभ्यासक मारोती चीतमपल्ली यांना तर कृषी क्षेत्रात भरीव कामगिरीसाठी सुभाष शर्मा आणि वैद्यकीय क्षेत्रातील उत्तम कार्यासाठी विलास डांगरे यांना पद्मश्री पुरस्कार आज जाहीर झाले आहेत. या वर्षी एकूण 139 पद्म पुरस्कार जाहीर झाले. यामध्ये 07 पद्म विभूषण, 19 पद्म भूषण आणि 113 पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. यांसह 23 महिला तर 10 हे परदेशी नागरिक आहेत. यातील 13 मान्यवरांना मरणोत्तर पद्म पुरस्कार जाहीर झाले आहेत.

#### पद्मश्री पुरस्कार

- अच्युत पालव – कलाक्षेत्र
- अरुंधती भट्टाचार्य – व्यापार आणि उद्योग
- अशोक सराफ – कलाक्षेत्र
- अश्विनी भिडे-देशपांडे – कलाक्षेत्र
- चैत्राम पवार – सामाजिक सेवा
- जसपिंदर नरुला – कलाक्षेत्र
- मारुती चितमपल्ली – साहित्यिक आणि अभ्यासक
- रणेंद्र मुजुमदार – कलाक्षेत्र
- सुभाष शर्मा – शेती
- वासुदेव कामत – कलाक्षेत्र
- विलास डांगरे – औषध

## 'अब राजा का बेटा राजा नही बनेगा..'

### एकनाथ शिंदे जालन्यातून कडाडले , उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल

। जालना । प्रतिनिधी : महाईन्यूज

**आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे जालन्याच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी बोलताना त्यांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. तुम्ही 97 जागा लढवल्या आणि 20 निवडून आल्या आम्हीं 80 लढविल्या आणि 60 जागा निवडून आल्या, मग सांगा खरी शिवसेना कोणाची असा सवाल यावेळी एकनाथ शिंदे यांनी उपस्थित केला आहे.**



काही लोकांनी शिवसेना कॉंग्रेसच्या दावणीला बांधली होती. धनुष्यबाण यांनी गहाण ठेवला होता, बाळासाहेबांचे विचार आणि धनुष्यबाण पेलण्याची ताकद एकनाथ शिंदेंमध्ये आहे, असा घणाघात यावेळी एकनाथ शिंदे यांनी केला.

#### काय म्हणाले एकनाथ शिंदे?

तुम्ही 97 जागा लढवल्या आणि 20 निवडून आल्या आम्हीं 80 लढविल्या आणि 60 जागा निवडून आल्या, मग सांगा खरी शिवसेना कोणाची? काही लोकांनी शिवसेना कॉंग्रेसच्या दावणीला बांधली होती. बाळासाहेबांचे विचार आणि धनुष्यबाण पेलण्याची ताकद एकनाथ शिंदेंमध्ये आहे. काही लोकांनी शिवसेना कॉंग्रेसच्या दावणीला बांधली होती, म्हणून 2 वर्षांपूर्वी आम्ही उठव केला. आता हे रडायला लागले आहेत. नवनवीन आरोप करायला लागले आहेत, माझं हे चोरलं ते चोरलं. घरात बसून निवडणुका नाही लढवता येत, असा टोला यावेळी एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना लगावला.

#### इथे कुणी मालक नोकर नाही

विरोधक ही योजना बंद करण्यासाठी कोर्टात गेले, पण त्यांना कोर्टाना हुसकावून लावलं, असंही एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. तुम्ही लढा मी कपडे सांभाळतो असे नको. घरात बसून निवडणूक जिंकता येत नाही. एवढे शिवसैनिक का येत आहे. तिकडे मालक नी नोकर , मात्र इथे कुणी मालक नोकर नाही. इथे सर्व शिवसैनिक आहेत. अब राजा का बेटा राज नहीं बनेगा, मला सर्वांनी सांगितले श्रीकांतला मंत्री बनवा मात्र आपण प्रतापराव जाधव यांना केंद्रात मंत्री बनवले असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

# पालिकेचे 210 कोटी रुपयांचे नुकसान

## अभय योजनेचा फायदा घेणारेच झाले पुन्हा थकबाकीदार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चार वर्षांपूर्वी महापालिकेच्या मिळकतकर अभय योजनेचा फायदा घेतलेल्यांपैकी निम्मे मालमत्ताधारक पुन्हा थकबाकीदार असल्याची माहिती समोर आली आहे. या थकबाकीदारांकडून तातडीने मिळकतकराची रकम वसूल करून त्यांना पुन्हा अभय योजनेचा फायदा दिला जाऊ नये, अशी मागणी केली जात आहे.**




मिळकतकराची कोट्यवधी रुपयांची थकबाकी वसूल व्हावी, यासाठी चार वर्षांपूर्वी (२०२०-२१) मध्ये महापालिकेने अभय योजना आणली होती, या योजनेचा फायदा घेऊन एक लाख ४९ हजार ६८३ थकबाकीदारांनी महापालिकेचा कर भरला. या योजनेमुळे महापालिकेने थकबाकीदारांना केलेला दंड आणि व्याजमाफी पोटी महापालिकेचे २१० कोटी रुपयांचे नुकसान झाले.

त्यानंतर दुसऱ्या वर्षी २०२१-२२ मध्ये महापालिकेने पुन्हा अभय योजना आणली होती. या योजनेचा फायदा ६६ हजार ४५४ थकबाकीदार मिळकतकरधारकांनी घेऊन थकबाकी भरली. या प्रक्रियेतही महापालिकेचे ६४ कोटी रुपयांचे नुकसान झाले. या योजनांमुळे दरवर्षी प्रामाणिकपणे वेळेवर कर भरणाऱ्या नागरिकांवर याचा परिणाम होईल. तसेच, यामुळे थकबाकीदार नवीन अभय योजना येईपर्यंत नियमित कर भरणार नाहीत, अशी भीती व्यक्त केली जात होती. ही भीती खरी ठरली असून, ज्या मिळकतदार थकबाकीदारांनी चार वर्षांपूर्वी महापालिकेच्या अभय योजनेचा फायदा घेतला होता. त्यातील निम्मे पुन्हा थकबाकीदार झाले आहेत. सजग नागरिक मंचाचे विवेक वेलणकर यांनी माहितीच्या अधिकारात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना महापालिकेने ही माहिती दिली आहे.चार वर्षांपूर्वी २०२०-२१ मध्ये एक लाख ४९ हजार ६८३ थकबाकीदार मालमत्ता धारकांनी अभय योजनेचा फायदा घेतला. त्यापैकी ६३ हजार ५१८ मालमत्ताधारक डिसेंबर २०२४ अखेर पुन्हा थकबाकीदार झाले. पुणेकरांच्या दृष्टीने महत्त्वाचे विभाग, त्यासाठी अंदाजपत्रकात सुचविलेले काही मोजके प्रकल्प आणि त्याची अंमलबजावणी किती झाली, हे पाहिल्यास प्रशासन हे कसे 'राज' करते, हे स्पष्ट होते. पुणेकरांचा जिव्हाळ्याचा विषय म्हणजे पाणीपुरवठा. पुणेकरांना २४ तास पाणी मिळण्यासाठी समान पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत शहराचे १४१ झोन पाडण्यात आले आहेत. त्यांपैकी ५६ झोनची कामे पूर्ण झाल्याचा महापालिकेचा दावा आहे. गेल्या वर्षभरात ७० साठवण टाक्या, ३०० किलोमीटर लांबीची वितरण व्यवस्था विकसित करणे आणि एक लाख नवीन जलमापक बसवून सर्व झोनमध्ये सर्वांना समान पाणीवाटप करण्याचा विडा अंदाजपत्रकातून प्रशासनाने उचलला होता. प्रत्यक्षात पुण्यात टँकरने पाणीपुरवठा सुरूच आहे आणि पुरेसे पाणी मिळत नसल्याची पुणेकरांची ओरड कायम आहे. मूळ पुण्याबरोबरच नव्याने समाविष्ट झालेल्या ३४ गावांमध्ये समान पाणीपुरवठा योजना राबविण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचाही निर्धार महापालिकेने केला होता. तो अद्याप गुलदस्तातच आहे. त्यामुळे अंदाजपत्रकातील या विभागाचा अंदाज चुकला. कचरा ही पुण्याची एक समस्या. कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी अंदाजपत्रकात काही महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुचिण्यात आले. त्यामध्ये रामटेकडी येथे कचऱ्यापासून ग्रीन हायड्रोजन निर्मिती करण्याचा प्रकल्प, समाविष्ट २३ गावांमधील जागा ताब्यात घेऊन कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणे, प्रत्येक प्रभागात रीसोर्स रीसायकलिंग सेंटर सुरू करून कचऱ्याचे विघटन करण्याची योजना, हे प्रकल्प पाहिल्यास कचऱ्याबाबतीत प्रशासन किती जागरूक आहे, हे समजते. प्रत्यक्षात शहरात अनेक ठिकाणी जागोजागी कचऱ्याचे ढीग दिसतात.

वाहतूक ही पुणेकरांची आणखी एक डोकेदुखी. त्यासाठी विश्रांतवाडी, शास्त्रीनगर चौक, खराडी बायपास, गणेशखिंड रस्ता, हडपसर, खडकी रेंजहिल्स, येरवडा, आळंदी रोड आदी ठिकाणी उड्डाणपूल किंवा ग्रेड सेपरेटर करण्याचे नियोजन अंदाजपत्रकात करण्यात आले होते.

मात्र, सध्या सुरू असलेल्याच उड्डाणपुलांना निधीची कमतरता भासू लागली आहे. वर्षभरात एकही उड्डाणपूल पूर्ण होऊन त्याचा वापर सुरू झालेला नाही. सिंहगड रस्त्यावरील उड्डाणपुलाचा अर्धा भाग वापरात येत असला, तरी विधानसभा निवडणुकीपूर्वी राजकारण सुरू झाल्यानंतर भाजपने घाईघाईने या अर्धवट काम झालेल्या उड्डाणपुलाचे उद्घाटन केले. अन्य उड्डाणपूल अद्याप जमिनीवरच आहेत.

### महापालिकेचा मिळकतकर थकविला

तर, २०२१-२२ मध्ये ज्या ६६ हजार ४५४ थकबाकीदार मालमत्ताधारकांनी अभय योजनेचा फायदा घेतला, त्यापैकी ४४ हजार ६८५ मालमत्ताधारक डिसेंबर २०२४ अखेर पुन्हा थकबाकीदार झाले आहेत. अभय योजनेचा फायदा घेतल्यानंतरही लाखापेक्षा अधिक मालमत्ताधारकांनी महापालिकेचा मिळकतकर थकविला आहे. त्यांना यापुढील काळात कोणतीही सवलत न देता महापालिकेने त्यांच्याकडून तातडीने थकबाकीची वसूल करावी तसेच अभय योजनेचा फायदा देखील या थकबाकीदारांना होणार नाही, यासाठी महापालिकेने लक्ष द्यावे, अशी मागणी वेलणकर यांनी महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्याकडे केली आहे.

---

# तृतीयपंथीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन

## नारी-दी वुमेन या सामाजिक संस्थेद्वारे देखणा उपक्रम, महाराष्ट्रात पहिल्यांदाच विवाह सोहळा

। पुणे । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडः देशात समलैंगिकतेला मान्यता मिळाल्यानंतर देशात दुसऱ्यांदा आणि महाराष्ट्रात पहिल्यांदाच तृतीयपंथीयांचा सामुहिक विवाह सोहळा पार पडणार आहे. नारी - दी वुमेन या सामाजिक संस्थेद्वारे या देखण्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार दिनांक 28 जानेवारी रोजी सायंकाळी 7 वाजता हिंदू प्रथा परंपरेनुसार पाच तृतीयपंथिय जोडप्यांचे लग्न पार पडणार असल्याची माहिती नारी - दी वुमेन संस्थेच्या कार्याध्यक्षा अर्चना मेंगडे यांनी दिली.**



या कार्यक्रमाचे आयोजन नारी - दी वुमेन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आसिफ शेख, उपाध्यक्ष अर्चना मेंगडे, कार्याध्यक्ष विशाल जाधव तसेच पवना समाचारचे संपादक नाना कांबळे या परिवर्तनशील विचारांच्या कृतिशील व्यक्तिंनी एकत्र येऊन नारी - दी वुमेन या संस्थेच्या माध्यमातून केले आहे.

हा विवाह सोहळा काळेवाडी येथील हिंदुस्तान बेकरीच्या पाठीमागे बालाजी लॉन्स या ठिकाणी होणार असून, दुपारी 12 ते 4 वाजेदरम्यान भोजन समारंभ असणार आहे. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, औद्यौगिक अशा विविध क्षेत्रातील मान्यवर या विवाह सोहळ्यास प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. जास्तीत जास्त संख्येने या सोहळ्यास उपस्थित राहून वधू-वरांस शुभाशिर्वाद द्यावेत, असे आवहन नारी - दी वुमन या संस्थेच्यावतीने आयोजकांनी केले आहे.

### परिवर्तनात्मक संदेश देणारा अनोखा विवाह सोहळा

पिंपरी-चिंचवडचे महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी यापूर्वीच तृतियपंथियांना महापालिका सेवेत सिक्युरिटी, ग्रिन मार्शल, सुरक्षा रक्षक म्हणून नोकरीची संधी देऊन तृतियपंथियांचा यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महापालिकेच्यावतीने विविध प्रकारे प्रयत्न केले जात आहेत. त्यामुळे तृतीयपंथियांना समाजात माणूस म्हणूस ताठ मानेने जगता येऊ लागले आहे. त्याचाच एक भाग म्हणून हा सामुदायिक विवाह सोहळा पिंपरी-चिंचवड शहरात परिवर्तनात्मक संदेश देणारा ठरेल, असा विश्वास आरिफ शेख यांनी व्यक्त केला आहे.

## अवैध सावकारी करणाऱ्यांवर

# आता कठोर कारवाई!

### पोलीस आयुक्तांचा आदेश : गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी उचलली पावले

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या अवैध सावकारीच्या त्रासातून कर्जदाराने जीवन संपविल्याच्या शहरात पंधरा दिवसांत दोन घटना घडल्याने पोलिसांनी अवैध सावकारी विरोधात कडक पाऊल उचलले आहे. अवैधरीत्या सावकारी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा आदेश पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिला आहे.**



खासगी सावकाराच्या तगाद्याला कंटाळून वडिलांनी दहा वर्षांच्या मुलाचा खून केला. त्यानंतर दाम्पत्याने गळफास लावून घेतला. त्यात आईचा मृत्यू झाला; तर वडील बचावले. ही घटना चिखली येथील सोनवणे वस्ती येथे घडली. अशीच घटना तीन जानेवारीला चिंचवड स्टेशन येथे घडली. सावकाराच्या जाचाने रिक्षाचालक राजू राजभर याने गळफास घेऊन आत्महत्या केली. पंधरा दिवसांत या दोन घटना घडल्या. पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अवैध सावकारीची काही प्रकरणे निदर्शनास येत असल्याने अशा गुन्हेगारांच्या कृत्यांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी पावले उचलली आहेत. अवैध सावकारी संदर्भात नागरिकांनी तक्रारी देण्यास पुढे यावे. यासाठी जनजागृती मोहीम राबविण्यात यावी. नागरिकांकडून भरमसाट व्याजाने पैसे उकळणारे, नागरिकांना छळ आणि धमक्या देणाऱ्या सावकारांविरुद्ध तत्काळ कठोर कार्यवाही करण्याचा आदेश सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना पोलीस आयुक्तांनी दिला आहे.

**कठोर शिक्षेची तरतूद**

अवैध सावकारी करणाऱ्यांना आळा घालण्यासाठी, त्यांच्या गुन्हेगारी कृत्यांना प्रतिबंध करुन त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी अधिक कडक आणि जरब बसविणाऱ्या तरतुदी असणारा विशेष कायदा महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ हा अंमलात आणला आहे. या कायद्यांतर्गत कठोर शिक्षेची तरतूद आहे. अवैध सावकारी किंवा भरमसाठ व्याज आकारणी करून कोणी फसवणूक करत असेल. तसेच तक्रारदारास धमक्या किंवा छळाचा धोका असल्यास संबंधितांनी तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा. अवैध सावकारी करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिला.

**आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या भूमिकेकडे लक्ष...**

हिंदळेकर यांनी पोलीस आयुक्तांना आवाहन केले आहे की, जर पोलीस खात्यातीलच अधिकारी सावकारी व्यवसायात गुंतलेले असतील, तर त्यांच्यावर कारवाई कोण करणार? सावकारी व्यवसाय फोफावण्यास काही पोलीस कर्मचाऱ्यांचे सहकार्य असल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे. बाळासाहेब हिंदळेकर यांनी त्यांच्या अर्जाद्वारे संबंधित प्रकरणांची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आवाहनही केले आहे. वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर सावकारी व्यवसायात गुंतले असल्याचे आरोप गंभीर आहेत. याप्रकरणी तातडीने निष्पक्ष चौकशी करून सत्य बाहेर आणण्याची गरज आहे. याबाबत आयुक्त विनय कुमार चौबे काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### पोलीस आयुक्तसाहेब, वर्दीतील सावकारांवर काय कारवाई करणार?

पिंपरी-चिंचवड: पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात अवैध सावकारी प्रकरणांवर कारवाईसाठी आयुक्तांनी निर्देश दिल्याचे दिसून येत आहे. मात्र, अशाच प्रकरणात पोलीस खात्यातील काही वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. हे आरोप माजी नगरसेवक बाळासाहेब तथा संभाजी अर्जुन हिंदळेकर यांनी केले आहेत. खासगी सावकाराच्या जाचाला कंटाळून चिखली येथे एका कुटुंबाने आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यात मुलगा व आईचा मृत्यू झाला तर वडील बचावले. या प्रकरणाची गंभीर दखल घेत पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी खासगी सावकारांवर कडक कारवाई करण्याचे आदेश काढले आहेत. या पार्श्वभूमीवर हिंदळेकर यांनी आयुक्तांना लेखी पत्र देऊन पोलीस खात्यातील सावकारांवरही कारवाई करण्याची मागणी केल्याने खळबळ उडाली आहे. बाळासाहेब हिंदळेकर यांनी आपल्या तक्रारीत सांगितले आहे की, काही वरिष्ठ पोलीस अधिकारी स्वतः सावकारी व्यवसाय चालवत आहेत. एका पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांवर मनमानी कारभाराचा आरोप करण्यात आला आहे. त्यांनी सावकारी प्रकरणात गुन्हेगारांना संरक्षण दिल्याचा संशय व्यक्त केला आहे. हिंदळेकर यांनी असा आरोप केला की, त्यांचे जावई अतुल मुंडे यांच्यावर उपनिरीक्षकांच्या हस्तक्षेपाने बळजबरी केली गेली. व्याजाने दिलेल्या रकमेची जबरदस्तीने वसुली करण्यासाठी मारहाण, अपहरण आणि धमक्यांचा वापर करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांनी पोलीस निरीक्षकांवर तक्रार दाखल करून न घेण्याचा आणि तपासासाठी टाळाटाळ केल्याचा आरोपही केला. अवैध सावकारांच्या दबावाखाली, त्यांच्या जावयावर आणि मुलावर दुसऱ्या एका पोलीस ठाण्यात खोटे गुन्हे दाखल करण्यात आल्याचा आरोप हिंदळेकरांनी केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, काही पोलीस अधिकारी सावकारांचे समर्थन करत असून, त्यांच्या विरोधात दिलेल्या अर्जांवर कोणतीही ठोस कारवाई होत नाही.

---

## जनसंवाद यात्रा : मावळ तालुक्यातील गल्ली-गल्लीत भेटी

### गावागावातील समस्या सोडवण्यासाठी आमदार सुनील शेळके यांची "ग्राऊंड व्हीजिट"!

। वडगाव मावळ । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मावळ विधानसभेचे आमदार सुनील शेळके नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी जनसंवाद दौऱ्याच्या माध्यमातून ग्राउंड व्हिजिट देत आहेत . मावळ विधानसभेतील प्रत्येक प्रभागात सध्या ते नागरिकांच्या भेटीगाठी घेत आहेत. प्रत्येक गल्लीतील महावितरण, नगरपरिषद, सार्वजनिक परिवहन, आरोग्य अशा विभागांशी संबंधित नागरिकांची प्रत्येक समस्या ते जाणून घेत आहेत. नागरिकांचा या जनसंवाद दौऱ्याला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.**



मावळ तालुक्यामध्ये आमदार सुनील शेळके यांनी जनसंवाद दौरा सुरू केला . या दौऱ्याची सुरुवात विधानसभेला सर्वाधिक मताधिक्य देणाऱ्या लोणावळा शहरापासून करण्यात आली होती. प्रभाग निहाय आमदार सुनील शेळके व त्यांचे कार्यकर्ते नागरिकांच्या घरापर्यंत जात त्यांच्या समस्या समजावून घेतल्या. त्यांची लेखी निवेदने प्राप्त करून घेतली. नगरपरिषद प्रशासन, वीज वितरण कंपनी, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना कामाबाबतचे निर्देश देखील देण्यात आले आहेत. नागरिकांनी सांगितलेल्या अंतर्गत रस्ते, गटारी, नाले, व्यायाम शाळा व नागरिकांच्या इतर समस्यांबाबत आमदार सुनील शेळके यांच्या माध्यमातून पाहणी करण्यात आली.

> "जनसंवाद यात्रेला नागरिकांचा भरभरून प्रतिसाद लाभत आहे. नागरिक आपल्या समस्या मांडण्यासाठी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहत आहेत. प्रत्येक नागरिकाची समस्या समजावून त्याची लेखी निवेदने घेतली जात आहेत. पुढील काही दिवसांमध्ये नियोजनबद्ध पद्धतीने काम करत विधानसभेतील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी वैयक्तिक लक्ष देणार आहे.
>
> **–सुनील शेळके,** आमदार, मावळ विधानसभा.




**संविधानातील अनुच्छेद २१ अंतर्गत प्रत्येक व्यक्तीच्या खासगी आयुष्यातील गोपनीयतेचे महत्व अधोरेखित होते. एखाद्या गुन्ह्यात आरोपी असली तरी त्या व्यक्तीचे खासगी आयुष्य हे मूलभूत अधिकारांच्या कक्षेत येते. गुन्हा दाखल झाल्यावर समाजाचा आरोपीविषयीचा दृष्टिकोन बदलत असला तरीही आरोपीचे मूलभूत अधिकार अबाधित असतात.**

# आरोपींनाही गोपनीयतेचा अधिकार आहेच!



२०२४ साली गुन्ह्यांत आरोपी असलेल्या दोन प्रकरणांत सर्वोच्च न्यायालयाचे निकाल आणि आदेश अनुच्छेद २१ अंतर्गत खासगी आयुष्य आणि गोपनीयतेच्या दृष्टीने महत्वाचे ठरले. 'फ्रँक विटस विरुद्ध नार्कोटीक्स ब्यूरो' आणि 'फ्यूचर गेमींग अँड हॉटेल्स सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड विरुद्ध डायरेक्टर एन्फोर्समेंट डायरेक्टोरेट'. यातील फ्रँक विटस प्रकरण हे जामीन अटींशी निगडीत असून फ्यूचर गेमींग प्रकरण इलेक्ट्रॉनीक उपकरणांच्या झडतीशी संबंधित आहे. फ्यूचर गेमींग प्रकरणात अंतिम निकाल नसून एकतर्फी अंतरिम स्थगिती देण्यात आली आहे. या निकालांचे वैशिष्ट्य असे की दोन्ही प्रकरणे फौजदारी स्वरूपाची आहेत.फ्रँक विटस प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाने आरोपींना जामीन देताना त्याचे गुगल लाइव्ह लोकेशन तपास यंत्रणेला देण्याच्या हमीवर जामीन मंजूर केला होता. प्रकरणात न्यायालयाने गुगलकडून सविस्तर प्रतिज्ञापत्र घेत यातील तांत्रिक बाबी समजून घेतल्या. न्या. अभय ओक व न्या. उज्जल भुयान यांच्या न्यायपीठाने जामिनाची अट असांविधानिक असून आरोपीच्या खासगी आयुष्य आणि गोपनीयतेचे अनुच्छेद २१ अंतर्गत उल्लंघन करणारी असल्याचे स्पष्ट केले. जामीनाचा उद्देश हा सतत आरोपीवर लक्ष ठेवणे नसून त्याच्या खासगी आयुष्यात तंत्रज्ञान अथवा इतर कुठल्याही स्वरुपात डोकावण्याची परवानगी मूलभूत अधिकारांवर अतिक्रमण ठरेल, असे मत नोंदवले. जामीन देऊनही आरोपीवर पाळत ठेवणे अटकेसमान आहे.

अशा प्रकारची जामीन अट म्हणजे जामिनाच्या मूळ उद्देशाचे उल्लंघन ठरेल याकडे निकालात सर्वोच्च न्यायालयाने लक्ष वेधले. अजामीनपात्र गुन्ह्यांत जामीन देणे अथवा नाकारणे हा न्यायालयाचा विशेषाधिकार आहे. यासंबंधित अनेक कायदेशीर संदर्भ असले मापदंड नाहीत. जामीन देणे अथवा नाकारणे हा सर्वस्वी न्यायालयाचा अधिकार असल्याचे कायदेशीर दाखले आहे. मूळात आरोपीला जामिनाचा मूलभूत अधिकारात समावेश होतो. त्याच अंतर्गत तुरुंग हा अपवाद जामीन हा नियम हे कायदेशीर तत्व न्या. कृष्णा अय्यर यांनी मांडले. गुन्ह्याचे गांभीर्य, परिस्थिती व प्रथमदर्शनी पुरावे या निकषांवर जामीन द्यावा अथवा नाकारावा हा अधिकार सर्वस्वी न्यायालयाचा. मूळात फ्रँक विटस नायजेरियन नागरिक, त्याही परिस्थितीत दिल्ली उच्च न्यायालयाने अटीसह त्याला जामीन दिला. सांविधानिकतेच्या निकषावर सर्वोच्च न्यायालयाने जामिनाच्या अटीवर केलेले भाष्य खासगी आयुष्य आणि गोपनीयता या मूलभूत अधिकाराच्या बाबतीत म्हणूनच महत्वाचे ठरते.फ्यूचर गेमींग अँड हॉटेल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड विरुद्ध एन्फोर्समेंट डायरेक्टोरेट प्रकरण हे लॉटरी किंग म्हणून ओळख असलेल्या सँटियागो मार्टीन याच्याशी संबंधित आहे. सँटियागो मार्टीनने विविध राजकीय पक्षांना १३०० कोटी रुपयांची देणगी दिल्याची बातमी प्रकाशित आहे. २०१९ सालापासून ईडी मार्टीन विरोधात काळा पैसा पांढरा करण्याच्या आरोपांचा शोध घेते आहे. १३ डिसेंबर २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या न्या. अभय ओक व न्या पंकज मित्तल यांच्या न्यायपीठाने फ्यूचर गेमींग अँड हॉटेल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या कर्मचाऱ्यांचे संगणक आणि मार्टीनच्या आयफोनमधील डेटा मिळावा यासाठी पीएमएलए कायदा कलम ५० अंतर्गत समन्सला अंतरिम स्थगिती दिली. न्यायालयाने दिलेली अंतरिम स्थगिती एका प्रकारे पीएमएलए कायदा कलम ५० च्या तरतुदीच्या सांविधानिकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी आहे. न्यायालयाने दिलेली एकतर्फी अंतरिम स्थगिती ही अंतिम नाही. याविषयी इतर काही याचिका प्रलंबित असल्याने त्यासमवेत फ्यूचर गेमींग प्रकरणाची पुढील सुनावणी १७ फेब्रुवारी रोजी निश्चित केलेली आहे.

## प्रासंगिक »

### कौन बनेगा..?

***... हा कार्यक्रम बघणारा प्रत्येकजण तिथे पोहोचणाऱ्यांमध्ये आपल्या मुलामुलींना, आईवडिलांना, आत्यामावशांना, काकामामांना बघतो...***

'वाय टू के'ची भीती अगदीच खोटी ठरली, बिल क्लिंटन भारतात आले, पंतप्रधान अटलबिहारी बाजपेयी यांनी 'आयसी १८४'च्या अपहरणासाठी पाकिस्तानला बोल लावले, अझीम प्रेमजी सर्वात श्रीमंत आशियाई बनले, ओरिसात नवीन पटनाईक यांचे पहिलेवहिले सरकार अस्तित्वात आले, आयोम शर्मिला यांचे उपोषण सुरू झाले, यश चोप्रा यांचा 'मोहब्बते', राजेश रोशन यांचा 'कहो ना प्यार है' तुफान चालले तर 'कही प्यार ना हो जाये', 'हे राम', 'फिझा' आपटले असे बरेच काही घडलेल्या वर्षातच 'देवियो और सज्जनो...' त्या त्यांच्या आवडत्या नायकाचे नव्या सहस्राकाच्या नवलाईतले हे नवे रुपडे होते. मुळात त्याने त्याचा तो अंगार, चमकधमक, वलय, त्याच्याबद्दलच्या कथा-दंतकथा हे सगळे सगळे बाजूला ठेवून छोट्या पडद्यावर सामान्य लोकांना थेट त्यांच्या घरात भेटायला येणे हे खरोखरच अविश्वसनीय होते.

दामदुप्पट परताव्याचे आमिष दाखवून लुबाडणे हा काही आज आश्चर्याचा मुद्दा राहिलेला नाही, मात्र गुन्हेगार सर्वसामान्यांना भयचकित करणे थांबवण्यास तयार नाहीत. एका प्रकारच्या गुन्ह्याविषयीच्या चर्चा सर्वदूर पसरून लोक जागरुक होईपर्यंत फसवणुकीचे नवे मार्ग शोधले जातात आणि नवनवे लोक बळी जात राहतात.

# हे गुंतवणुकीचे नव्हे, फसवणुकीचे मार्ग

मधल्या काळात शेअर बाजारातील तेजीच्या बातम्यांनी अनेकांना भुलविले. अनेकजण यात पैसे गुंतवून श्रीमंत होण्यासाठी सरसावले, मात्र कोणत्याही गुंतवणूक पर्यायाविषयी काही मूलभूत गोष्टी जाणून घेतल्याशिवाय त्या वाटेला जाऊ नये, हे पथ्य आजही अनेकजण पाळत नाहीत आणि मग मोठा फटका बसल्यावरच शहाणपण येते. असे 'अर्धशिक्षित' गुंतवणुकदार सायबर भामट्यांचे सहज लक्ष्य ठरतात. त्यांना भुलविण्यासाठी आता हे भामटे व्हॉट्सअॅप ग्रुप्सचा मार्ग अवलंबू लागले आहेत. अलीकडे प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन असतो आणि त्यावर व्हॉट्सअॅपही हमखास असते. सायबर भामटे त्यावर फेक मेसेज पाठवतात. काही वेळा फेसबुक, इन्स्टाग्राम किंवा यूट्यूब अशा लोकप्रिय माध्यमांतून एखादा व्हॉट्सअॅप ग्रुप जॉइन करण्यासाठीच्या लिंक प्रसारित केल्या जातात. या लिंक्सचा सतत मारा केला जातो. सर्वसामान्य माणूस




सहज विश्वास ठेवत नाही. दुर्लक्ष करतो. लिंक डिलीट करतो, मात्र तरीही सतत लिंक येतच रहातात. मग कोणी ना कोणी उत्सुकतेपोटी त्या लिंकवर क्लिक करते आणि तो ग्रुप जॉइन केला जातो. मग त्यांचे शेअर मार्केट ट्रेडिंगचे अॅप (बनावट) डाउनलोड करण्यास सांगितले जाते. त्यात ओटीसी आणि आयपीओ असे दोन ट्रेडिंग चे प्रकार असतात. त्यानंतर त्या भामट्यांच्या 'व्हॉट्सअॅप डिस्कशन ग्रुप'वर संबंधित गुंतवणुकदाराला अॅड केले जाते. त्या ग्रुपवर जवळपास ८०-९० टक्के हे त्यांच्याच गँगचे भामटे असतात. त्यांचे फेक ट्रेडिंग अॅप जॉइन केल्यानंतर ते त्यात संबंधिताचे अकाऊंट उघडतात. लॉगिन, पासवर्ड दिला जातो. त्याचबरोबर बँक डिटेल्स, आधारकार्ड, पॅनकार्ड, मोबाइल नंबर घेऊन सर्व सोपस्कार पार पाडले जातात. नंतर ते अकाऊंट रीचार्ज करण्यास सांगतात. म्हणजे ट्रेडिंग करण्यासाठी त्यात पैसे टाकण्यास सांगतात. ही रक्कम कमीत कमी पाच हजारांपासून जास्तीत जास्त कितीही असू शकते. ते पैसे जमा करण्यासाठी ते एक अकाऊंट नंबर देतात. हे अकाऊंट फक्त ३० मिनिटेच अॅक्टिव राहील असे ते सांगतात. त्या दरम्यान त्यात पैसे नाही टाकता आले तर वेगळा अकाऊंट नंबर देतात. अशा प्रकारची अनेक अकाऊंट त्यांचेकडे असतात. मग त्या अॅपमधील जमा रकमेनुसार आपल्याला ओटीसी अन्डर शेअर खरेदी करण्यास सांगतात. ते एका कंपनीचे नाव देऊन त्या कंपनीचे शेअर खरेदी कारायला सांगतात. जमा असलेल्या रकमेनुसार त्या शेअरवर १० ते ५० टक्क्यांपर्यंत सूट देण्यात येते.शेअर खरेदी केल्या केल्या लगेच त्यात फायदा झाल्याचे दिसते. हा प्रकार दुपारी २ ते ४ दरम्यान चालतो.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ठाकरेंचे निवडणुकीसाठी स्वबळाचे संकेत

## भाजपाचे ज्येष्ठ नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना इशारा

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बाळासाहेब ठाकरेंच्या जयंती निमित्त आज मुंबईत शिवसेना (ठाकरे) पक्षाचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यातून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आगामी महापालिका निवडणुका स्वबळावर लढवण्याचे संकेत दिले आहेत. याबरोबरच ठाकरेंनी भाजपाचे ज्येष्ठ नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना इशारा देखील दिला आहे.**



आगामी महापालिका निवडणुकां स्वबळावर लढवण्याबद्दल बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, "येत्या काही काळात महापालिकेच्या निवडणुका येणार आहेत. मी सगळ्यांशी बोलतो आहे. मुंबई, संभाजीनगर नाशिक सगळ्यांशी बोलून झालं. सगळ्यांचं म्हणणं आहे की एकटं लढा".पुढे बोलताना ठाकरे समोर उपस्थित कार्यकर्त्यांना उद्देशून म्हणाले की,"ताकद आहे? अमित शहांना जागा दाखवणार आहात? ठीक आहे... अजून निवडणूक जाहीर झाली नाही. तुमची जिद्द, तयारी बघू द्या... ज्या भ्रमात आपण राहिलो, त्या भ्रमातून पहिलं बाहेर या....ज्या क्षणी माझी खात्री पटेल की आपली तयारी झाली आहे, मी कार्यकर्त्यांच्या मनाप्रमाणे निर्णय घेतल्याशिवाय राहणार नाही". "पण यावेळी मला सूड उगवून पाहिजे.. सूड, सूड आणि सूड होय सूड... जो महाराष्ट्राच्या पाठीत वार करतो. जो मराठी आईच्या कुशीवरती वार करतो तो गद्दार आणि त्या गद्दाराचा वरदहस्त मला महाराष्ट्रात दिसता कामा नये", असेही उद्धव ठाकरे म्हणाले. "जर तुम्ही सगळे शपथ घेऊन सांगत असाल तर जेव्हा वेळ येईल तेव्हा मी एकटं लढण्याचा निर्णय नक्की घेतल्याशिवाय राहाणार नाही", असेही उद्धव ठाकरे यांनी उपस्थित शिवसैनिकांना सांगितले.

उद्धव ठाकरेंचं अमित शाह यांना जोरदार प्रत्युत्तर, "जखमी वाघ काय असतो आणि त्याचा पंजा..." ठाकरेंचा अमित शाहांना इशारा "अमित शाहांना सांगतो की जास्त आमच्या नादी लागू नका. आज थोडासा ट्रेलर दाखवला आहे. जेवढे अंगावर याल तेवढे वळ घेऊन दिल्लीला परत जाल", असा इशाराही उद्धव ठाकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना यावेळी बोलताना दिला. "आज बाळासाहेब असते तर त्यांनी...", विधानसभा निवडणुकीतील विजयाबद्दल एकनाथ शिंदेंनी अमित शाह, मराठी माणसाच्या नादी लागू नका-उद्धव ठाकरे उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या भाषणादरम्यान अमित शाह यांच्यावर जोरदार टीका केली, ते म्हणाले की, मराठी माणसाच्या नादी लागू नका, जिथे औरंगजेबाला या महाराष्ट्राने झुकवलं तिथे अमित शाह किस झाड की पत्ती? मी मुद्दाम जाहीर सभा घेतली. कारण म्हटलं कळू तरी द्या की माझ्याबरोबर किती लोक राहिले आहेत? अमित शाह तुम्ही माझी जागा ठरवू शकत नाही. कारण माझी जागा ठरवणारी बाळासाहेब ठाकरेंनी दिलेली ही माझी शिवसैनिकांची संपत्ती आहे. जे शिवसेनाप्रमुख बोलायचे की जोपर्यंत तुम्ही शिवसैनिक तोपर्यंत शिवसेनाप्रमुख आहे, तेच मी सांगतो आहे जोपर्यंत तुम्ही आहात तोपर्यंत मी तुमचा पक्ष प्रमुख आहे. गद्दारांनी वार केले तर हा उद्धव ठाकरे संपणार नाही. गद्दारांना गाडूनच मी संपेन अशी गर्जना उद्धव ठाकरेंनी केली. आगामी महापालिका निवडणुकां स्वबळावर लढवण्याबद्दल बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, "येत्या काही काळात महापालिकेच्या निवडणुका येणार आहेत. मी सगळ्यांशी बोलतो आहे. मुंबई, संभाजीनगर नाशिक सगळ्यांशी बोलून झालं. सगळ्यांचं म्हणणं आहे की एकटं लढा".पुढे बोलताना ठाकरे समोर उपस्थित कार्यकर्त्यांना उद्देशून म्हणाले की,"ताकद आहे? अमित शहांना जागा दाखवणार आहात? ठीक आहे... अजून निवडणूक जाहीर झाली नाही. तुमची जिद्द, तयारी बघू द्या... ज्या भ्रमात आपण राहिलो, त्या भ्रमातून पहिलं बाहेर या....ज्या क्षणी माझी खात्री पटेल की आपली तयारी झाली आहे.

### मी मुद्दाम जाहीर सभा घेतली

मी कार्यकर्त्यांच्या मनाप्रमाणे निर्णय घेतल्याशिवाय राहणार नाही". "पण यावेळी मला सूड उगवून पाहिजे.. सूड, सूड आणि सूड होय सूड... जो महाराष्ट्राच्या पाठीत वार करतो. जो मराठी आईच्या कुशीवरती वार करतो तो गद्दार आणि त्या गद्दाराचा वरदहस्त मला महाराष्ट्रात दिसता कामा नये", असेही उद्धव ठाकरे म्हणाले. "जर तुम्ही सगळे शपथ घेऊन सांगत असाल तर जेव्हा वेळ येईल तेव्हा मी एकटं लढण्याचा निर्णय नक्की घेतल्याशिवाय राहाणार नाही", असेही उद्धव ठाकरे यांनी उपस्थित शिवसैनिकांना सांगितले. "अमित शाहांना सांगतो की जास्त आमच्या नादी लागू नका. आज थोडासा ट्रेलर दाखवला आहे. जेवढे अंगावर याल तेवढे वळ घेऊन दिल्लीला परत जाल", असा इशाराही उद्धव ठाकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना यावेळी बोलताना दिला. "आज बाळासाहेब असते तर त्यांनी...", विधानसभा निवडणुकीतील विजयाबद्दल एकनाथ शिंदेंनी अमित शाह, उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या भाषणादरम्यान अमित शाह यांच्यावर जोरदार टीका केली, ते म्हणाले की, मराठी माणसाच्या नादी लागू नका, जिथे औरंगजेबाला या महाराष्ट्राने झुकवलं तिथे अमित शाह किस झाड की पत्ती? मी मुद्दाम जाहीर सभा घेतली.

---

# शरद पवारांची प्रकृती बिघडली

## पुढील चार दिवसाचे नियोजित कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत

।कोल्हापूर।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष आणि महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते शरद पवार यांची प्रकृती बिघडली आहे. यामुळे पुढील चार दिवसांचे त्यांचे कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. एएनआय या वृत्तसंस्थेने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. एएनआयने दिलेल्या वृत्तानुसार,शरद पवारांना खोकला झाल्याने बोलण्यास अडचणी येत आहेत. त्यामुळे कार्यक्रमांत त्यांना भाषण देता येत नाही.**

परिणामी पुढील चार दिवसांचे त्यांचे सर्व नियोजित कार्यक्रम रद्द करण्यात आल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून देण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून शरद पवार राज्यातील विविध जिल्ह्यांत दौऱ्यावर आहेत. पुण्यातील दोन कार्यक्रमात अजित पवार आणि शरद पवार एकाच व्यासपीठावर दिसले होते, तेव्हाही अनेक चर्चांना उधाण आले होते. त्यानंतर, काल त्यांनी कोल्हापुरातील एका कार्यक्रमात हजेरी लावली. या कार्यक्रमात त्यांनी उद्धव ठाकरेंनी आगामी पालिकेच्या निवडणुकांमध्ये दिलेला स्वबळाचा नारा टोकाचा वाटत नसल्याचं ते म्हणाले. तसंच, अमित शाहांनी केलेल्या



टीकेवरही त्यांनी प्रत्युत्तर दिलं. महाविकास आघाडीतील काही आमदार, खासदार आमच्याकडे प्रवेश करणार आहेत, असे विधान उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दावोस येथे केले. त्यांच्या दाव्याला उत्तर देताना पवार यांनी, सामंत हे तिकडे उद्योगातील गुंतवणूक आणण्यासाठी गेले आहेत, की पक्ष फोडायला? ते आमदार, खासदार कधी फुटतात याचीच वाट पाहतोय, अशी मिश्किल शेरेबाजी त्यांनी केल्यावर हास्य पसरले. मी राज्याचा मुख्यमंत्री असताना मीदेखील दावोसला गेलो होतो, असा उल्लेख करून पवार म्हणाले, की काल झालेल्या करारांपैकी अनेक कंपन्यांचे करार तीन वर्षांपूर्वी झाले होते. जिंदाल कंपनी ही महाराष्ट्रातील असताना त्यांच्याशी दावोसमध्ये करार केल्याचे दिसते.

### कोल्हापुरात पवार काय म्हणाले?

महाराष्ट्रात गुंतवणूक झाल्याचा देखावा करण्यात आला. याला फसवणूक म्हणता येणार नाही. मात्र, ज्यांना गुंतवणूक करायची आहेल त्यांना महाराष्ट्रात एकत्र करायला हवे होते, असेही पवार म्हणाले.त्यांच्या दाव्याला उत्तर देताना पवार यांनी, सामंत हे तिकडे उद्योगातील गुंतवणूक आणण्यासाठी गेले आहेत, की पक्ष फोडायला? ते आमदार, खासदार कधी फुटतात याचीच वाट पाहतोय, अशी मिश्किल शेरेबाजी त्यांनी केल्यावर हास्य पसरले. मी राज्याचा मुख्यमंत्री असताना मीदेखील दावोसला गेलो होतो, असा उल्लेख करून पवार म्हणाले, की काल झालेल्या करारांपैकी अनेक कंपन्यांचे करार तीन वर्षांपूर्वी झाले होते.

# बेईमानांच्या यादीत राहुल गांधींचाही समावेश

## ‘आप’ने पहिल्यांदाच राहुल गांधी यांच्यावरही टीकास्त्र सोडले

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी आता अवघे काही दिवस उरले असताना पक्षांचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. दिल्लीत यंदा तिरंगी लढत होत असून आप आणि भाजपा प्रमुख प्रतिस्पर्धी आहेत. तर काँग्रेसही स्वतंत्रपणे निवडणुकीला सामोरे जात आहे. आम आदमी पक्ष आणि भाजपा यांच्यात प्रत्यक्ष मैदानात आणि सोशल मीडियावर जोरात प्रचार सुरू असताना आज ‘आप’ने सोशल मीडियावरून काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्यावर पहिल्यांदाच टिकास्त्र सोडले. ‘आप’ने एक्सवर एक डिजिटल पोस्टर शेअर केले असून त्यात बेईमान नेत्यांची यादी दिली आहे. यात राहुल गांधी यांचाही समावेश करण्यात आला आहे.**



या पोस्टरवर माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांचा फोटो आहे. “केजरीवाल की ईमानदारी, सारे बेईमानों पर पडेगी भारी”, अशी टॅगलाईन देण्यात आली आहे. तर खाली ‘आप’ने ठरविलेल्या अप्रामाणिक नेत्यांचे फोटो देण्यात आले आहेत. यामध्ये पहिलाच फोटो पंतप्रधान नरेंद्र मोदी, दुसरा फोटो केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि तिसरा फोटो लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा लावण्यात आला आहे. यावरून आता ‘आप’ने थेट राहुल गांधींवरही हल्ला केल्याचे बोलले जात आहे. राहुल गांधी यांनी नुकतीच ‘आप’ सरकारच्या कारकिर्दीवर टीका केली होती. दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेत्या शीला दीक्षित यांच्या काळात दिल्लीत जो विकास झाला, तसा विकास अरविंद केजरीवाल यांच्या काळात झाला नाही, असे राहुल गांधी म्हणाले होते. गुरुवारी जाहीर सभेत बोलत असताना राहुल गांधी म्हणाले, “माजी मुख्यमंत्री शीला दीक्षित यांच्या खऱ्या विकासाच्या मॉडेलची दिल्लीला आवश्यकता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ‘आप’चे संयोजक अरविंद केजरीवाल यांच्या खोट्या प्रचार तंत्राला आणि पीआर मॉडेलला लोकांनी बळी पडू नये.”राहुल गांधींनी यापूर्वी आरोप केला की, अरविंद केजरीवाल हे पंतप्रधान मोदींप्रमाणेच प्रचार आणि खोट्या आश्वासनांची री ओढत आहेत. राजधानी दिल्लीतील वाढते प्रदूषण, भ्रष्टाचार आणि महागाईला रोखण्यात ते अपयशी ठरले आहेत. तसेच दलित आणि आदिवासींसारख्या उपेक्षित घटकांना त्यांचे हक्क व अधिकार मिळावेत, असे पंतप्रधान किंवा ‘आप’च्या संयोजकांना वाटत नाही, असाही आरोप राहुल गांधी यांनी केला होता. राहुल गांधी यांच्यासह काँग्रेसचे नेते अजय माकन आणि शीला दीक्षित यांचे सुपुत्र संदीप दीक्षितही ‘आप’च्या पोस्टरवर दिसत आहेत. अजय माकन यांनी केजरीवाल देशद्रोही असल्याची टीका केली होती. तर संदीप दीक्षित हे अरविंद केजरीवाल यांच्या विरोधात नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवित आहेत.या पोस्टरवर माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांचा फोटो आहे. “केजरीवाल की ईमानदारी, सारे बेईमानों पर पडेगी भारी”, अशी टॅगलाईन देण्यात आली आहे. तर खाली ‘आप’ने ठरविलेल्या अप्रामाणिक नेत्यांचे फोटो देण्यात आले आहेत. यामध्ये पहिलाच फोटो पंतप्रधान नरेंद्र मोदी, दुसरा फोटो केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि तिसरा फोटो लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा लावण्यात आला आहे. यावरून आता ‘आप’ने थेट राहुल गांधींवरही हल्ला केल्याचे बोलले जात आहे. राहुल गांधी यांनी नुकतीच ‘आप’ सरकारच्या कारकिर्दीवर टीका केली होती. दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेत्या शीला दीक्षित यांच्या काळात दिल्लीत जो विकास झाला, तसा विकास अरविंद केजरीवाल यांच्या काळात झाला नाही, असे राहुल गांधी म्हणाले होते. गुरुवारी जाहीर सभेत बोलत असताना राहुल गांधी म्हणाले, “माजी मुख्यमंत्री शीला दीक्षित यांच्या खऱ्या विकासाच्या मॉडेलची दिल्लीला आवश्यकता आहे.

### दिल्लीत यंदा तिरंगी लढत

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ‘आप’चे संयोजक अरविंद केजरीवाल यांच्या खोट्या प्रचार तंत्राला आणि पीआर मॉडेलला लोकांनी बळी पडू नये.”राहुल गांधींनी यापूर्वी आरोप केला की, अरविंद केजरीवाल हे पंतप्रधान मोदींप्रमाणेच प्रचार आणि खोट्या आश्वासनांची री ओढत आहेत. राजधानी दिल्लीतील वाढते प्रदूषण, भ्रष्टाचार आणि महागाईला रोखण्यात ते अपयशी ठरले आहेत. तसेच दलित आणि आदिवासींसारख्या उपेक्षित घटकांना त्यांचे हक्क व अधिकार मिळावेत, असे पंतप्रधान किंवा ‘आप’च्या संयोजकांना वाटत नाही, असाही आरोप राहुल गांधी यांनी केला होता. राहुल गांधी यांच्यासह काँग्रेसचे नेते अजय माकन आणि शीला दीक्षित यांचे सुपुत्र संदीप दीक्षितही ‘आप’च्या पोस्टरवर दिसत आहेत. तर संदीप दीक्षित हे अरविंद केजरीवाल यांच्या विरोधात नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवित आहेत.दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी आता अवघे काही दिवस उरले असताना पक्षांचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. दिल्लीत यंदा तिरंगी लढत होत असून आप आणि भाजपा प्रमुख प्रतिस्पर्धी आहेत. तर काँग्रेसही स्वतंत्रपणे निवडणुकीला सामोरे जात आहे.

# दुर्मीळ खगोलीय घटनेचे साक्षीदार होण्याची संधी!

## आकाशात प्लॅनेट परेड; जाणून घ्या कशी पाहायची ग्रहांची फेरी

। प्रयागराज ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आज रात्री म्हणजेच २५ जानेवारी रोजी आकाशात एक महत्त्वाची खगोलीय घटना घडणार आहे, ज्यामध्ये सहा ग्रह एका सरळ रेषेत एकत्र दिसतील, याला खगोलीय भाषेत प्लॅनेट परेड असे म्हणतात. या प्लॅनेट परेडमध्ये शुक्र, मंगळ, गुरु, युरेनस, वरुण आणि शनि या ग्रहांचा समावेश आहे.**

दरम्यान हे ग्रह २१ जानेवारीपासून आकाशात सरळ रेषेत दिसत आहेत. पण, २५ जानेवारी रोजी रात्री ते एकमेकांच्या अगदी जवळ आल्याचे पाहायला मिळणार आहे. सध्या हे खगोलीय दृश्य लोकांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे आणि त्यामुळे खगोलशास्त्रात रस असलेले लोक त्याबद्दल खूप उत्सुक आहेत. खरंतर, या काळात शुक्र आणि शनि दोन अंशांच्या आत येताना दिसतील. ग्रहांचे संरेखन सामान्य असले तरी, दरवर्षी आकाशात इतके ग्रह एकत्र दिसत नाहीत आणि म्हणूनच खगोलशास्त्रज्ञांसाठी ही एक महत्त्वाची घटना आहे असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.रात्रीच्या आकाशात दोन किंवा अधिक ग्रह दिसू लागतात तेव्हा ग्रहांची एक फेरी (प्लॅनेट परेड) होते. ही या घटनेची अधिकृत खगोलशास्त्रीय



व्याख्या नसली तरी, या प्रसंगी ग्रहांच्या दृश्यमानतेमुळे याला प्लॅनेट परेड किंवा ग्रहांची फेरी म्हणतात. आकाशात आज जे ग्रह दिसणार आहेत त्यापैकी, गुरु ग्रह सर्वात तेजस्वी असेल, त्यानंतर मंगळ आणि शुक्र ग्रह असतील, ते सूर्यास्तानंतर त्यांची सर्वोच्च तेजस्वीता गाठतील. अहवालानुसार, बुध फक्त काही क्षणांसाठी चमकेल आणि नंतर अदृश्य होईल, तर शनी ठळकपणे दिसण्याची अपेक्षा आहे.इटलीचा ‘व्हर्च्युअल टेलिस्कोप प्रोजेक्ट’ २५ जानेवारी रोजी भारतीय वेळेनुसार रात्री ११:०० वाजता या प्लॅनेट परेडचे मोफत वेबकास्टिंग करणार आहे. तुम्ही त्यांच्या अधिकृत वेबसाइट किंवा YOUTUBE चॅनेलला भेट देत ही खगोलीय घटना पाहू शकता. खगोलशास्त्रज्ञ जियानलुका मासी या कार्यक्रमाचे आयोजन करणार असून, ते दुर्बिणीद्वारे सर्व सहा ग्रहांचे थेट वेबकास्टिंग करतील. असे वृत्त इंडियन एक्सप्रेसने दिले आहे.

### प्लॅनेट परेड म्हणजे काय?

हा रोबोटिक टेलिस्कोपद्वारे चालवला जाणारा एक प्लॅटफॉर्म आहे. जो जगभरातील रात्रीच्या आकाशाचे रिअल-टाइम, चित्तथरारक दृश्ये देतो. या प्रकल्पात तज्ञांच्या नेतृत्वाखाली थेट ऑनलाइन कार्यक्रम आयोजित केले जातात. उच्च दर्जाच्या खगोलशास्त्रीय सामग्रीसाठी ओळखला जाणारा हा प्रकल्प सर्वांसाठी खुला आहे. दरम्यान हा प्रकल्प २००६ मध्ये सुरू करण्यात आला होता. आज रात्री म्हणजेच २५ जानेवारी रोजी आकाशात एक महत्त्वाची खगोलीय घटना घडणार आहे

# सोनाक्षीने मुंबईत खरेदी केले अपार्टमेंट!

सोनाक्षी सिन्हाने नुकतेच मुंबईतील एका आलिशान इमारतीत नवीन घर घेतले आहे. अभिनेत्रीच्या या नवीन घराची किंमत अंदाजे 11 कोटी रुपये आहे. सोनाक्षीने वांद्रे येथील केसी रोडजवळील 81 ओरियट बिल्डिंगच्या वरच्या मजल्यावर घर घेतले आहे. रिअल इस्टेटशी संबंधित वेबसाइट झापकीच्या माध्यमातून मिळालेल्या डॉक्युमेंटनुसार, सोनाक्षीचे नवीन घर 2208.7 स्क्वेअर फूटमध्ये पसरले आहे. अभिनेत्रीने नवीन घराची नोंदणी केली. त्यासाठी त्यांनी 55 लाख रुपये मुद्रांक शुल्क आणि 30 हजार रुपये मालमत्ता नोंदणीही भरली आहे. अभिनेत्रीच्या या घरात लॉबी, टॉयलेट आणि एअर हँडलिंग युनिटसारख्या सुविधा आहेत. याशिवाय सोनाक्षीच्या बिल्डिंगमध्ये 4 कार पार्किंगही उपलब्ध आहे. कागदपत्रांनुसार, सोनाक्षीच्या घरात 1,653.67 स्क्वेअर फूटचे टेरेसही आहे. अभिनेत्रीच्या या नवीन घरातून माहीम खाडी आणि वांद्रे वरळी सी लिंकचे दृश्य दिसते. सोनाक्षीने मार्च 2020 मध्ये बांद्रा येथे तिचे पहिले अपार्टमेंट घेतले होते. त्याची किंमत सुमारे 14 कोटी रुपये आहे. सोनाक्षीपूर्वी अभिनेता अर्जुन कपूरने या टॉवरच्या 19व्या मजल्यावर अपार्टमेंट विकत घेतले होते. पण त्याने मे 2022 मध्ये 16 कोटी रुपयांना विकले होते. त्याची गर्लफ्रेंड मलायका अरोरा हिनेही या इमारतीत 14.5 कोटी रुपयांना अपार्टमेंट बूक केले होते. बिग बॉस स्टार करण कुंद्राने 2022 मध्ये याच टॉवरमध्ये 14 कोटी रुपयांना एक अपार्टमेंट खरेदी केले होते. अभिनेत्रीच्या या घरात लॉबी, टॉयलेट आणि एअर हँडलिंग युनिटसारख्या सुविधा आहेत. याशिवाय सोनाक्षीच्या बिल्डिंगमध्ये 4 कार पार्किंगही उपलब्ध आहे.



# मी आयुष्यभर माझ्या वजनाशी झगडत आले

'क्युंकी सास माँ, बहू बेटी होती है' या टीव्ही शोचा भाग असलेली अभिनेत्री नाविका कोटिया ही आधी बाल अभिनेत्री होती. 10 वर्षांपूर्वी ती दिवंगत अभिनेत्री श्रीदेवीसोबत 'इंग्लिश विंग्लिश' चित्रपटात दिसली होती. गेल्या काही वर्षांत नाविकामध्ये खूप बदल झाले आहेत. अलिकडेच, एका खास संवादादरम्यान बोलताना तिने वजन कमी करणे आणि तिच्या संघर्षांबद्दल सांगितले. संवादादरम्यान तिनं श्रीदेवीशी संबंधित काही आठवणी शेअर केल्या. "मी आणि शिवांश कोटिया, ज्यांनी श्रीदेवीजींच्या मुलाची भूमिका केली होती, आम्ही दोघांनी या चित्रपटासाठी ऑडिशन दिले होते. चित्रपटाच्या एका बैठकीदरम्यान, निर्मात्यांना कळले की आम्ही भाऊ आणि बहीण आहोत. यानंतर त्यांनी आमचे पुन्हा ऑडिशन घेतले आणि निवड झाली. शूटिंगदरम्यान आम्ही खूप एन्जॉय केले कारण आम्ही सेटवर भाऊ-बहीण एकत्र होतो, आमचे आई-वडील उपस्थित होते. या चित्रपटाने आमच्यासाठी अनेक दरवाजे उघडले. अभिनेत्याचे कौशल्य सुधारण्याची संधी मिळाली. त्यासाठी मी सदैव कृतज्ञ आहे. एवढ्या मोठ्या स्टार असूनही त्यांच्याकडे अजिबात अहंकार नव्हता. त्या संपूर्ण सेटची, संपूर्ण क्रूची काळजी घ्यायच्या. त्यांच्या घरून आमच्यासाठी जेवण यायचे. कितीही ताप आला तरी त्यांनी काम करायला कधीच नकार दिला नाही. त्या त्यांचे काम उत्तम पद्धतीने करायच्या. त्यांच्याकडून खूप काही शिकायला मिळाले. खर सांगू, मी आयुष्यभर माझ्या वजनाशी झगडत आले आहे. मी लहानपणापासूनच एक गुबगुबीत मुलगी होती. त्यात हेही वास्तव आहे की, आपण ज्या इंडस्ट्रीत आहोत.



# मला बिग ब्रदरमधून जास्त लोकप्रियता मिळाली

एका मुलाखतीत, अभिनेत्रीने तिच्या कारकिर्दीतील ब्रिटिश रिॲलिटी टीव्ही शो 'बिग ब्रदर'च्या महत्त्वाबद्दल सांगितले. या शोने तिला स्वतंत्र कसे केले हेही तिने सांगितले. 90 च्या दशकात शिल्पाचे अनेक चित्रपट हिट झाले असले तरी तिला कधीच टॉप अभिनेत्रीचा दर्जा मिळाला नाही. मात्र, २००७ मध्ये ती ब्रिटिश रिॲलिटी टीव्ही शो 'बिग ब्रदर'ची विजेती बनल्यानंतर तिच्या आयुष्यात मोठा बदल झाला. सिद्धार्थ काननला दिलेल्या मुलाखतीत शिल्पा म्हणाली, 'या शोने मला चित्रपटांपेक्षा जास्त लोकप्रियता दिली. मला विश्वास आहे की इथेच माझ्या कारकिर्दीला काव्यात्मक न्याय मिळाला. असे अनेक कलाकार आहेत ज्यांना चित्रपटातूनही लोकप्रियता मिळाली नाही, जी मला या शोमधून मिळाली. हा माझ्यासाठी आयुष्य बदलणारा शो होता. मुलाखतीत अभिनेत्रीने असेही सांगितले की, या शोनंतर ती आयुष्यात स्वतंत्र व्हायला शिकली, नाहीतर याआधी तिची आई नेहमीच तिच्यासोबत राहायची. शिल्पा म्हणाली, 'माझ्यासाठी हे खूप कठीण होते कारण तोपर्यंत मी खूप संरक्षित होते. माझी आई अनेकदा माझ्या आउटडोअर शूटवर माझ्यासोबत असायची. माझ्या वडिलांनी ही अट घातली होती. बिग ब्रदरनंतरच मी स्वतंत्र व्हायला शिकले. 'सुखी'ची कथा एका गृहिणीच्या जीवनावर आधारित आहे जी आपल्या कुटुंबाला न सांगता शाळेच्या गेट टुगेदरसाठी दिल्लीला निघते. सोनल जोशी दिग्दर्शित हा चित्रपट महिला सक्षमीकरणावर हलक्याफुलक्या पद्धतीने भाष्य करतो. यात अमित साध, कुशा कपिला आणि पावलीन गुलाटी हे कलाकार आहेत. शिल्पा म्हणालीअसे अनेक कलाकार आहेत ज्यांना चित्रपटातूनही लोकप्रियता मिळाली नाही.



# अशोक सराफ यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर

अभिनेते अशोक सराफ यांना पद्मश्री हा पुरस्कार जाहीर झाला आहे. पद्म पुरस्कारांची घोषणा आज म्हणजेच प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला करण्यात आली. अभिनेते अशोक यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. या यादीत महाराष्ट्रातली इतरही महत्त्वाची नावं आहेत. अशोक सराफ यांचं विनोदाचं टायमिंग जबरदस्त आहे. नाटक, चित्रपट आणि मालिका अशा तिन्ही विश्वांमध्ये वावरलेले आणि अजूनही आपलं टायमिंग साधत उत्तम विनोद करणारे अशोक सराफ हे एक हरहुन्नरी कलाकार आहेत. त्यांच्या अशीही बनवा बनवी मधील धनंजय मानेचं गारुड आजही प्रेक्षकांच्या मनावर कायम आहे. विनोदाच्या परफेक्ट टायमिंगच्या या बादशहाला पद्मश्री पुरस्कार मिळणं ही कलासृष्टीसाठी अभिमानाचीच बाब आहे यात शंका नाही.मूळचे बेळगावचे असणाऱ्या अशोक सराफ यांचा जन्म मुंबईत झाला.दक्षिण मुंबईतील चिखलवाडी या भागात त्यांचे बालपण गेलं. गोपीनाथ सावकार हे त्यांचे मामा होत. अशोक सराफ यांचे शिक्षण मुंबईतील डी.जी.टी. विद्यालयात झाले. त्यांना सुरुवातीपासूनच नाटकांची अतिशय आवड होती. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी शिरवाडकरांच्या ‘ ययाती आणि देवयानी ‘ या नाटकातील विदूषकाच्या भूमिकेद्वारा व्यावसायिक रंगभूमीवर पाऊल ठेवलं. काही संगीत नाटकांतूनदेखील त्यांनी भूमिका केल्या. त्यांची आजवरची लक्षात राहिलेली ‘माईलस्टोन’ भूमिका म्हणजे अशीही बनवा बनवी या सिनेमातली धनंजय मानेची भूमिका आहे. तसंच ‘पांडू हवालदार’ या सिनेमात त्यांनी दादा कोंडकेंसह अभिनय केला. तसंच ‘राम राम गंगाराम’ या दोन चित्रपटांमध्ये दादा कोंडके यांच्यासह त्यांनी भूमिका केल्या.

# तिलकच्या खेळीने जिंकलं सूर्याचं मन!

## वाकून सलाम करतानाचा व्हिडीओ होतोय व्हायरल

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील दुसरा सामना २५ जानेवारी रोजी चेन्नई येथे खेळला गेला. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने हा सामना २ गडी राखून जिंकला. या सामन्याचा हिरो तिलक वर्मा ठरला, ज्याने दमदार अर्धशतकी खेळी साकारुन इंग्लंडला पराभवाची चव चाखायला लावली. त्याने शेवटपर्यंत फलंदाजी करत विजयी चौकार मारत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. या विजयानंतर सूर्याचा आणि तिलकचा एक खास व्हिडीओ व्हायरल होत आहे.**



तिलक वर्माने विजयी चौकार मारल्यानंतर दमदार सेलिब्रेशन केले. ज्याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. या व्हिडीओ तिलकने विजयी चौकार मारल्यानंतर धावत जाऊन उंच उडी मारली. त्यानंतर स्टेडियममध्ये उपस्थित असलेल्या सर्व चाहत्यांना अभिवादन केले. त्याचबरोबर डावा हात कानाला लावला आणि उजव्या हाताने आकाशाकडे बोट केले. त्यानंतर समोरुन धावत आलेल्या सूर्याला पाहून त्याने वाकून नमन केले. यावेळी सूर्याने त्याला वाकून सलाम केला आणि टाळ्या वाजवून त्याचे कौतुक केले. शेवटी दोघांनी हसत-हसत एकमेकांची गळाभेट घेतली. ज्याचा व्हिडीओ तुफान व्हायरल होत आहे.इंग्लंडविरुद्ध तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना तिलक वर्माने भारताची धुरा यशस्वीपणे सांभाळली. एकीकडे भारताचे इतर फलंदाज मोठी खेळी खेळण्यात अपयशी ठरले. दुसरीकडे तिलकने भारताचे एक बाजू गंभीरपणे सांभाळली. त्याने इंग्लंडच्या सर्व गोलंदाजांचा धैर्याने सामना केला आणि सर्व गोलंदाजांविरुद्ध आक्रमक फटकेबाजी केली. त्याने ५५ चेंडूत ७२ धावांची खेळी साकारली.

या दरम्यान तिलकने १३०.९१ च्या स्ट्राइक रेटने फलंदाजी केली. त्याने ५ षटकार आणि ४ चौकार मारले.तिलक वर्माशिवाय वॉशिंग्टन सुंदरने १९ चेंडूंत तीन चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने २६ धावांचे योगदान दिले. त्याचबरोबर नववा फलंदाज म्हणून आलेला रवी बिश्नोई पाच चेंडूंत नऊ धावा करून नाबाद माघारी परतला. इंग्लंडकडून ब्रायडेन कार्सेने तीन विकेट्स घेत संघाला विजयाकडे नेण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला, पण तिलकच्या खेळीसमोर त्याचे प्रयत्न यशस्वी होऊ शकले नाहीत. इंग्लंडकडून जोफ्रा आर्चर, मार्क वुड, आदिल रशीद, जेमी ओव्हरटन आणि लियाम लिव्हिंगस्टोन यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.तत्पूर्वी या सामन्यात सूर्यकुमार यादवने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडने २० षटकात ९ बाद १६५ धावा केल्या होत्या. इंग्लंडकडून जोस बटलरने सर्वाधिक धावा केल्या. त्याने ३० चेंडूत ४५ धावा केल्या. याशिवाय ब्रेडन कार्सने १७ चेंडूत ३१ धावांचे योगदान दिले. भारताकडून वरुण चक्रवर्ती आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. तसेच अर्शदीप सिंग, हार्दिक पंड्या, अभिषेक शर्मा, वॉशिंग्टन सुंदर यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. तिलक वर्माने विजयी चौकार मारल्यानंतर दमदार सेलिब्रेशन केले. ज्याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. या व्हिडीओ तिलकने विजयी चौकार मारल्यानंतर धावत जाऊन उंच उडी मारली. त्यानंतर स्टेडियममध्ये उपस्थित असलेल्या सर्व चाहत्यांना अभिवादन केले. त्याचबरोबर डावा हात कानाला लावला आणि उजव्या हाताने आकाशाकडे बोट केले. त्यानंतर समोरुन धावत आलेल्या सूर्याला पाहून त्याने वाकून नमन केले. यावेळी सूर्याने त्याला वाकून सलाम केला आणि टाळ्या वाजवून त्याचे कौतुक केले. शेवटी दोघांनी हसत-हसत एकमेकांची गळाभेट घेतली. ज्याचा व्हिडीओ तुफान व्हायरल होत आहे.

### सुंदरने तिलकला दिली साथ

इंग्लंडविरुद्ध तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना तिलक वर्माने भारताची धुरा यशस्वीपणे सांभाळली. एकीकडे भारताचे इतर फलंदाज मोठी खेळी खेळण्यात अपयशी ठरले. दुसरीकडे तिलकने भारताचे एक बाजू गंभीरपणे सांभाळली. त्याने इंग्लंडच्या सर्व गोलंदाजांचा धैर्याने सामना केला आणि सर्व गोलंदाजांविरुद्ध आक्रमक फटकेबाजी केली. त्याने ५५ चेंडूत ७२ धावांची खेळी साकारली. या दरम्यान तिलकने १३०.९१ च्या स्ट्राइक रेटने फलंदाजी केली. त्याने ५ षटकार आणि ४ चौकार मारले.तिलक वर्माशिवाय वॉशिंग्टन सुंदरने १९ चेंडूंत तीन चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने २६ धावांचे योगदान दिले. त्याचबरोबर नववा फलंदाज म्हणून आलेला रवी बिश्नोई पाच चेंडूंत नऊ धावा करून नाबाद माघारी परतला. इंग्लंडकडून ब्रायडेन कार्सेने तीन विकेट्स घेत संघाला विजयाकडे नेण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला, पण तिलकच्या खेळीसमोर त्याचे प्रयत्न यशस्वी होऊ शकले नाहीत.

---

# हॅरी ब्रुक वरूणच्या गोलंदाजीवर क्लीन बोल्ड

## कोलकात्याच्या ईडन गार्डन्समध्ये थोडं धुकं होतं, इथे धुकं नाही

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत-इंग्लंड दुसऱ्या टी-२० सामन्यात इंग्लंड संघाने भारताला विजयसाठी १६६ धावांचे लक्ष्य दिले आहे. मोठी भागीदारी रचता आली नसली तरी इंग्लंडच्या फलंदाजांनी चौकार षटकारांमध्ये गोलंदाजीला उत्तर दिली. भारताच्या गोलंदाजांनीही आपली उत्कृष्ट गोलंदाजी केली. इंग्लंडचा युवा फलंदाज हॅरी ब्रुक सध्या चर्चेत आहे, कारण दुसऱ्या टी-२० सामन्यातही वरूण चक्रवर्तीच्या गोलंदाजीवर तो बाद झाला.**



कोलकातामध्ये झालेल्या पहिल्या टी-२० सामन्यात अपयशी ठरलेल्या ब्रूकने धुकं असल्याने नीट खेळता आल्याचे म्हणाला होता, पण आता दुसऱ्या टी-२० सामन्यातही सर्वकाही स्पष्ट दिसत असतानाही तो अपयशी ठरला आणि पुन्हा एकदा वरुण चक्रवर्तीच्या फिरकीचा बळी ठरला.चेन्नईतील दुसऱ्या टी-२० सामन्यातही इंग्लंडने प्रथम फलंदाजी केली. यावेळी सर्वांच्या नजरा या सामन्यापूर्वी आपल्या वक्तव्याने सर्वांना चकित करणाऱ्या हॅरी ब्रूकवर खिळल्या होत्या. कोलकाता येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या टी-२० सामन्यात या उजव्या हाताच्या फलंदाजाला भारतीय फिरकी गोलंदाज वरुण चक्रवर्तीने त्याच्या फिरकीने चकमा देत क्लीन बोल्ड केले होते. यानंतर ब्रूकने पत्रकार परिषदेत सांगितले होते की, कोलकात्यात जास्त धुकं असल्यामुळे तो वरुणचा चेंडू नीट पाहू शकत नव्हता.हॅरी ब्रूक दुसऱ्या सामन्यात वरूणच्या गोलंदाजीवर कसा खेळणार यावर सर्वांच्या नजरा होत्या. पण झालं तेच जे पहिल्या टी-२० सामन्यात घडलं होतं. इंग्लंडने झटपट विकेट गमावल्याने त्याला लवकर फलंदाजीला यावं लागलं, क्रीझवर येताच त्याने झटपट एक चौकार आणि एक षटकार ठोकला. असे वाटत होते की ब्रूकने कोलकात्यात म्हटल्याप्रमाणे नीट खेळत होता.

### आता तर लाईट नीट आहे

पण पुन्हा एकदा वरुणने त्याला आपल्या गुगलीत अडकवून क्लीन बोल्ड केले. ब्रूक स्टंप विखुरलेले पाहून आश्चर्यचकित होऊन हसला आणि पुन्हा माघारी परतला.हॅरी ब्रूक बाद होताच सुनील गावस्करांनी समालोचन करताना त्याची चांगलीच फिरकी घेतली. गावस्कर म्हणाले, "पुन्हा एकदा वरूण चक्रवर्ती. आता तर लाईट नीट आहे. चेन्नईमध्ये धुकं नाहीय प्रकाश व्यवस्थित आहे. कोलकात्याच्या ईडन गार्डन्समध्ये थोडं धुकं होतं, इथे धुकं नाहीय, ऑफ-स्टंपच्या वरच्या बाजूला चेंडू नेमका कुठे जातोय, हेच त्याला कळलं नाही.